प्रकरण : सात

# उपसंहार

## प्रकरण : सात

# उपसंहार

राजन गवस यांच्या कथात्म साहित्याचा विविधांगी अभ्यास करून मराठी साहित्यात त्यांचे कथात्म साहित्य कसे वेगळेपण राखते; हे आपण पाहिले. आता आपण या अभ्यासाचा सारांश रूपाने आढावा घेऊ. त्यांनी आपल्या एकूण साहित्यलेखनामध्ये कथा, कादंबरी, कविता, ललित निबंध आणि समीक्षा अशा विविध साहित्यप्रकारांत लेखन केले आहे. त्यांच्या *चौंडकं* (१९८५), *भंडारभोग* (१९८८), *कळप* (१९९१), *धिंगाणा*(१९९२) आणि *तणकट*(२००१) या कादंबऱ्या तसेच *रिवणावायली मुंगी* (२००१) हा कथासंग्रह प्रसिद्ध आहे. याशिवाय त्यांनी ललित गद्य, समीक्षा, अध्यापन व संपादन या क्षेत्रातही मौलिक कामगिरी केली आहे. *हुंदका* (१९८२)हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. आपल्या काव्यलेखनातही गवस यांनी गावगाड्यातील जीवनानुभव रेखाटले आहेत. *भाऊ पाध्ये यांची कादंबरी* (१९९६) हा समीक्षाग्रंथ ,तसेच *काचाकवड्या* हे ललितगद्य, *मराठीचे आशययुक्त अध्यापन* हे अध्यापनशास्त्रावरील पुस्तक असे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय *तिरकसपणातील सरळता* हे रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीवरील समीक्षाणात्मक लेखांचे संपादन आणि *चांगदेव चतुष्ठयासंबधी* हे भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीवरील लेखाचे महत्त्वपूर्ण संपादन त्यांनी केले आहे.

प्रस्तुत अभ्यासात मात्र त्यांच्या कथा आणि कादंबऱ्या यांचाच विचार केला आहे. हा अभ्यास कथात्म साहित्याच्या निकषांच्या आधारे केला आहे. कथात्म साहित्यात जीवनानुभव, व्यक्तिचित्रण, अवकाशवर्णन, संवाद, भाष्य आणि निवेदन व भाषा हे घटक महत्त्वपूर्ण असतात. या घटकांना वास्तवता आणि लेखकाची नैतिकता म्हणजेच जीवनदृष्टी यांचे संदर्भ कसे प्राप्त झाले आहेत याचा शोध घेतला आहे. गवस यांच्या साहित्याचे सर्वांगीण आकलन व्हावे, त्यांच्या लेखनाचे वेगळेपण स्पष्ट व्हावे यासाठी प्रस्तुत अभ्यासात आपण पुढील उद्दिष्ट्ये निश्चित केली होती.

१. राजन गवस यांच्या कथात्म साहित्यातील आशयसूत्रांचा शोध घेणे. २. राजन गवस यांच्या साहित्यातील उपेक्षितांच्या चित्रणाचे स्वरूपविशेष तपासणे. ३. गवस यांच्या साहित्यातील चळवळी, राजकीय प्रवृत्तींच्या चित्रणाच्या स्वरूप-विशेषांची चर्चा करणे. ४.

गवस यांच्या साहित्यातील देशीयता आणि लेखकाची नैतिकता यांचा शोध घेणे. ५. राजन गवस यांच्या साहित्याच्या भाषेचे आणि निवेदनाचे स्वरूपविशेष कोणते याचा शोध घेणे. ६. गवस यांच्या साहित्याचे मूल्यमापन करणे आणि त्यांच्या साहित्याचे मराठी साहित्यप्रवाहातील स्थान अधोरेखित करणे. या उद्दिष्टांच्या अनुषंगाने या अभ्यासाला एक निश्चित दिशा प्राप्त व्हावी या उद्देशाने प्रबंधातील प्रकरणांची मांडणी पुढीलप्रकारे केली आहे.

प्रकरण एक : कथात्म साहित्याची संकल्पना आणि साठनंतरचे कथात्म साहित्य .

प्रकरण दुसरे : राजन गवस यांच्या कथात्म साहित्यातील उपेक्षितांचे जीवनवास्तव.

प्रकरण तिसरे : राजन गवस यांच्या कथात्म साहित्यातील सामाजिक चळवळीं व राजकीय प्रवृत्तींचे चित्रण.

प्रकरण चौथे : राजन गवस यांच्या कथात्म साहित्यातील देशीयता अणि लेखकाची नैतिकदृष्टी/नैतिकता.

प्रकरण पाचवे : राजन गवस यांच्या कथात्म साहित्यातील निवेदन आणि भाषा.

प्रकरण सहावे : राजन गवस यांच्या कथात्म साहित्याचे मूल्यमापन.

प्रकरण सातवे : उपसंहार.

अशाप्रकारे प्रकरणे निश्चित करून पहिल्या प्रकरणात कथात्म साहित्याची संकल्पना विशद केली आहे.त्याचबरोबर साठोत्तर कथात्म साहित्याचा वास्तवता आणि लेखकाची नैतिकता म्हणजेच विवेकशील मूल्यदृष्टी या निकषांच्या आधारे विचार केला. एकूण साहित्याचे काव्य , कथनात्मक साहित्य, व नाटक हे मुख्य भेद केले जातात. कथन या भाषिक प्रक्रियेतून कथात्म साहित्यातील जीवनानुभव प्रकट होत असतो. लेखक घटना, प्रसंग, पात्रे, निवेदन , निवेदक, संवाद व भाष्य याद्वारे जीवनानुभवांची मांडणी साहित्यातून करीत असतात. कथात्म साहित्यातील आशय अन्य साहित्यप्रकारांपेक्षा अधिक थेटपणे, वास्तवदर्शी स्वरूपात मांडता येतो. कथात्म साहित्याचे आधुनिक काळात कथा आणि कादंबरी हे दोन साहित्यप्रकार

विशेषत्वाने लिहिले जात असल्यामुळे कथात्म साहित्य म्हणून त्यांचाच विचार प्रामुख्याने केला जातो.

कथात्म साहित्याच्या संकल्पनेचा विचार केल्यानंतर साठपूर्व कालखंडातल्या कादंबरीमागील प्रवृत्तींचा विचार केला आहे. साठपूर्व कालखंडातील कादंबरीच्या निर्मितीप्रेरणा पाहता, असे दिसते की वास्तववादी व रंजनवादी अशा दोन प्रमुख प्रवृत्ती या काळातल्या कादंबरीमागे असलेल्या दिसतात. मराठी कादंबरीचा आजवरचा प्रवास पाहता आशय व शैलीच्या बाबतीत मराठी कादंबरीचे स्वरूप तीनवेळा बदललेले दिसते. हरि नारायण आपटे यांच्या काळात ती पहिल्यांदा बदलली,त्यांनी बोधवादी, वास्तववादी कादंबरीचा आकृतिबंध रूढ केला. फडके-खांडेकरांच्या काळात कादंबरीत परिवर्तन झाले ते रंजनप्रधान कादंबरी निर्माण केली. तर साठोत्तर काळात कादंबरी अनेक अंगानी बदलली असे दिसते. साठोत्तर कादंबरीच्या निर्मितीमागे स्वअस्मितेच्या प्रकटीकरणाची, शोषणमुक्त समाजासाठी परिवर्तनवादी विचार व्यक्त करण्याची, अशा प्रमुख प्रेरणा होत्या तर रोमँटिक, वास्तववादी व व्यस्ततावादी प्रवृत्ती असलेल्या दिसतात.

शिक्षणाचा समाजाच्या सर्व स्तरांत झालेला प्रसार हे प्रमुख कारण या काळातील कथात्म साहित्यात अनेकपदरी वास्तव चित्रित होण्यामागे होत्या. शिक्षण घेऊन सज्ञान झालेल्या पिढीच्या मनात समाजवास्तवाविषयी अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले. या प्रश्नांची उत्तरे शोधता शोधता हे लेखन घडत गेले असे दिसते.

साठोत्तर कादंबऱ्यांतील आशयसूत्रांचा विचार करताना असे पाहिले की, राजकीय, प्रायोगिक कादंबरी, ऐतिहासिक-पौराणिक कादंबरी अशा विविध प्रवाहात कादंबरीची निर्मिती झाली. यामध्ये राजकीय कादंबरीत ऐतिहासिक- पौराणिक, दलित कादंबरीत ग्रामीण अशा आशयसूत्रांची सरमिसळ झालेली दिसते तशी काही प्रमाणात अन्यप्रकारांतही ही सरमिसळ झालेली दिसते. सांस्कृतिक संक्रमणामुळे एकजिनसी अनुभवविश्वाला या काळात फाटा मिळाला, असे दिसते. महानगरी जीवनानुभव व्यक्त करणाऱ्या कादंबरीमध्ये परात्मता या आशयसूत्राबरोबर हतबलता, आर्थिक कुचंबणा, अर्थशून्यता, एकाकीपणा असे अनेक भाव सक्षमपणे चित्रित झाले. महानगरातल्या सर्वस्तरांतले जीवन कादंबरीमधून प्रकटले. या काळातील राजकीय व्यवस्थेकडून झालेला भ्रमनिरास, त्यातून निर्माण होणारा संघर्ष हे राजकीय कादंबरीमागील मध्यवर्ती सूत्र दिसते. तसेच संसदीय राजकारणाचा गावगाड्यावर झालेला परिणाम व विविध सामाजिक संस्थामधून केले जाणारे राजकारण या काळातल्या राजकीय कादंबरीत चित्रित झाले. त्यामुळे राजकीय कादंबरीचे

क्षितिज विस्तारत गेलेले दिसते. साठोत्तर काळातील ऐतिहासिक पौराणिक आशय व्यक्त करणारी कादंबरी रंजनप्रधानतेच्याच आहारी गेलेली दिसते. विभूतिपूजा आणि शुद्ध ऐतिहासिक कादंबरी लिहिण्याचे प्रयत्न या सूत्रांभोवती ही कादंबरी लिहिली गेली. या कादंबरीचे यश साहित्यबाह्य मूल्यांवर अधिष्ठित असलेले दिसते. साठोत्तर काळात दलित कादंबरीची निर्मिती क्षीण स्वरूपात झाली.पण ऐंशीच्या दशकापासून दलित कादंबरीचा परिघ अधिक विस्तारत गेला. जातजाणिवेपेक्षा ही कादंबरी वर्गीय जाणिवा अधिक प्रभावीपणे व्यक्त करू लागली.ग्रामीण व दलित अशा दोन प्रवाहाचे एकात्म रूप दलित कादंबरीत दिसते.प्रयोगवादी कादंबरीत जीवनातील संवाद संपून गेल्याची जाणीव व्यक्त झाली. या कादंबरीत रचनेचे विविध प्रयोग होताना दिसतात. वरील आशयसूत्रे घेऊन लिहिलेल्या कादंबऱ्यांमधून सामाजिक वास्तव मांडणारी कादंबरी अधिक प्रबळ ठरली. त्यातूनच ग्रामीण, दलित, आदिवासी असे प्रवाह ठळक होत गेले.

साठोत्तर कादंबरीच्या आशयसूत्रांबरोबर या कादंबऱ्यांतून प्रकट झालेली लेखकाची जीवनदृष्टी विचारात घेतली आहे. साठोत्तर काळातील कादंबरीकारांची नैतिकजीवनदृष्टी व्यापक होती. वास्तववादी प्रवृत्तीमुळे प्रखर नैतिकतेची अनेक रूपे या काळातल्या कादंबरीत प्रकट झालेली दिसतात. जीवनविषयक मूलभूत प्रश्नांची मांडणी या काळातल्या कादंबऱ्यांतून झाली, असे म्हणता येईल. हे लेखन सामाजिक, नैतिकमूल्यांना धक्के देणारे ठरले. या लेखकांची मूल्यदृष्टी सामाजिक तत्त्वविचारांनी प्रभावित झालेली दिसते. मात्र रंजनप्रधानता टाळून इतिहासावर भाष्य करणे ऐतिहासिक कादंबरीकारांना शक्य झाले नाही. दलित, स्त्रीवादी कादंबरीकारांची नैतिकता क्रांतिलक्ष्यी आशयसूत्रे, विद्रोही मूल्ये व व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी होती.

साठनंतरच्या कादंबरीत कथानकरचनेला दुय्यमत्त्व प्राप्त होऊन जीवनदृष्टीला प्राधान्य मिळालेले दिसते. या काळातल्या कादंबरीत घटना-प्रसंगांचे कालक्रमानुसार निवेदन करणे किंवा आरंभ, मध्य, अंत,निरगाठ, उकल अशा फडकेप्रणित रचनेपेक्षा कथाशयाच्या गरजेनुसार बदलते निवेदन येते. काहीवेळा घटनाप्रधानता टाळून लेखन केले जाते. चर्चा, विश्लेषण, दैनंदिनी, स्वगत, वक्तृत्व अशा निवेदनप्रकारांचा वापर केलेला दिसतो. या काळातल्या कादंबरीत मध्यमवर्गीय जीवनापलीकडचे जीवन चित्रित झाले. सामान्य माणसातील असामान्यत्व शोधून ते अधोरेखित करण्याचा प्रयत्न कादंबरीकारांनी केला. व्यक्तींच्या नायकत्वापेक्षा त्यांचे प्रतिनायकत्व प्रभावी ठरले. कथानकाची व्यामिश्रता, पात्रांची भावस्थिती, सामाजिक स्तर, दु:ख, एकाकीपण, दारिद्र्य, कामाच्या वा नोकरीच्या जागा यानुसार

कादंबरीतील अवकाश बदलतात. झोपडपट्टीपासून मंत्रालयापर्यंत सारेच अवकाश कादंबरीकारांनी विविध संदर्भांनी चित्रित केले. त्यात प्रतीकात्मताही आणण्याचा प्रयत्न केला. साठोत्तर काळातल्या कादंबरीतील भाषा अवकाशाप्रमाणे, पात्रांच्या स्तरभेदाप्रमाणे बदलताना दिसते. त्यातही तरुणांची स्लँग भाषा, विविध प्रदेशातील बोलीरूप भाषा, विद्रोह, नकार यानी भरलेली, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी भाषा, उपहास-उपरोधपूर्ण भाषा, प्रतीकात्मक भाषा येथे दिसते. भाषेचे प्रयोगही या काळातल्या कादंबरीकारांनी केलेले दिसतात. कादंबरीची भाषाच कादंबरीचे रूप घडविते ही जाणीव या काळातल्या कादंबरीच्या आशयरूपामागे असलेली दिसते.

साठोत्तर कादंबरीचा कथात्म साहित्याचे एक अंग म्हणून विचार केल्यानंतर साठोत्तर कथेचे वास्तवदर्शीत्व आणि लेखकाची मूल्यदृष्टी या निकषांच्या आधारे विवेचन केले आहे. १९४५ नंतर नवकथेचा उदय झाला पण वास्तववादी कथेला खरा बहर साठोत्तर काळातच येत गेला, असे दिसते. नवकथा मनोदर्शनावर अधिक भर देते. त्या कथेत समाजदर्शनाला गौणत्व प्राप्त होताना दिसते. माटे, शिरूरकर असे एकदोन लेखक सामाजिक वास्तवाला अधिक प्रत्ययकारी रूप देण्याचा प्रयत्न करताना दिसतात.साठोत्तर कथेत मनोविश्लेषणाला प्रधान्य न देता घटनाप्रधानतेला महत्त्व मिळाले. जी. ए. कुलकर्णी, चिं. त्र्यं. खानोलकर हे लेखक सामाजिक वास्तवापेक्षा नियतिप्रधानतेकडे झुकणारी कथा लिहिताना दिसतात.

साठोत्तर काळातील कथेचा विचार करताना विश्लेषणाच्या सोयीसाठी कथेचे पुढीलप्रकारे वर्गीकरण केले. अस्तित्ववादी कथा, ग्रामीण कथा, दलित कथा, स्त्री लिखित कथा इ.या काळात असे ठळक प्रवाह निर्माण झालेले दिसतात. अस्तित्ववादी कथा जीवनातील विसंगती, अर्थशून्यता प्रखरपणे चित्रित करते. ग्रामीणकथेत गावगाड्यातील विविध जातीजमातींमधील माणसे, त्यांचे सुखदु:खात्म चित्रण करते. या कथेत नवकलाकार, भटके-विमुक्त, शेतकरी, श्रमिक या साऱ्यांचे चित्रण त्यांच्या भूसांस्कृतिक वैशिष्ट्यांसह झालेले दिसते. खेड्यातील मन्वंतर ही कथा प्रातिनीधिकतेने रेखाटते. दलित कादंबरीपेक्षा दलित कथा या काळात अधिक प्रमाणात लिहिली गेली. धर्म, राजकारण, समाजरचना, अर्थसत्ता यांमधील विकृती, विदारकता ही कथा अधिक जोरकसपणे व्यक्त करते. समाजातील विविध स्तरांतील शोषण हा दलित कथेचा केंद्रबिंदू होता. ऐंशीनंतर दलित कथेचे क्षितिज लेखकांनी विस्तारत नेलेले दिसते. दलित कथेबरोबरच स्त्रियांच्या कथेत बंडखोर आवाज प्रकटला. ही कथा स्त्रीविशिष्ट अनुभवांबरोबर पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधात संघर्षात्मक भूमिका घेऊन लिहिली

गेली. मराठीतील विज्ञानकथेचा फारसा विकास झाला नसला तरी काही लेखकांनी वास्तवाच्या आधारे कल्पित वास्तव मांडण्याचा सफल प्रयत्न केलेला आहे. साठोत्तर काळातील विज्ञानातील शोध आणि वैज्ञानिक संकल्पनांवर ही कथा आधारलेली दिसते.अशाप्रकारे साठोत्तर काळातील कथात्म साहित्याचे स्वरूप सांगता येईल.

दुसऱ्या प्रकरणात आपण राजन गवस यांच्या कथात्म साहित्यामध्ये उपेक्षितांचे जीवनवास्तव कसे चित्रित झाले हे पाहिले. गवस यांनी जोगता-जोगतिणींच्या चित्रणाने उपेक्षितांच्या जीवनाकडे पाहण्याची नवी मानसिकता अधोरेखित केली. जोगता हा नपुंसक नसतो, समाज त्याच्यावर हे ओझे लादतो, जोगतिणीं ह्या कोणत्याही पापाच्या बळी नसून समाजाच्या अंध मानसिकतेच्या बळी आहेत, अशी नवी मांडणी गवस यांनी केली आहे. तसेच दलितांचे जीवन आधुनिक काळात राजकीय प्रवृत्तींमुळे दिशाहीन होत गेले, दलितांचे शोषण वेगवेगळ्या मार्गांनी या काळातही होत राहिले याचेही भान त्यांनी प्रकट केले

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात दलित जीवनाचे जे चित्रण झाले यामध्ये दलितेतरांनी केलेले दलित जीवनाचे चित्रण आणि दलित लेखकांनी केलेले दलित जीवनाचे चित्रण अशा दोन परंपरा होत्या, त्या दोन्ही वास्तववादीच असलेल्या दिसतात.गवस यांनी पहिल्या परंपरेला अधिक सक्षमपणे पुढे नेण्याचा प्रयत्न आपल्या लेखनातून केले, असे म्हणता येईल. उपेक्षितांमध्ये प्रारंभी महार-मांग या गावगाड्यात स्थिरावलेल्या जातिसमूहांचा विचार केला जात असे पण पुढे भटके-विमुक्त, गावगाड्याबाहेरचे, धर्म, लिंग, वर्ण अशा घटकांच्या आधारे शोषले गेलेले सर्व या संज्ञेखाली आले, त्यामुळे उपेक्षितपणाचा परीघही वाढत गेला. राजन गवस यांनी आपल्या कथात्म साहित्यातून महार-मांग यांच्याबरोबर देवदासी-जोगते यांचे उपेक्षित जीवन व्यक्त केले.

देवदासी-जोगते हे विकृत धर्मवर्तनामुळे, अंधश्रद्धेच्या मानसिकतेमुळे सामाजिक शोषणाच्या विळख्यात सापडतात. शिक्षण, कुटुंब या व्यवस्थांपासून त्यांना दूर व्हावे लागते. किंबहुना कुटुंबव्यवस्थेकडून होणाऱ्या छळामुळे अन्य सामाजिक संस्थामधील त्यांचे अस्तित्व धोक्यात येते. सामाजिक अवहेलना, तिरस्कार, उपहास, उपजीविकेचे प्रश्न यामुळे त्यांचे जीवन क:पदार्थ बनते.देवदासी ह्या पुरुषप्रधान संस्कृतीच्या लैंगिक गुलामीकरणाच्या प्रथेच्या बळी आहेत. प्राचीन काळापासून ही प्रथा समाजात रूढ आहे. सर्वधर्मात आणि संस्कृतीत ह्या प्रथेची विविध रूपे रूढअसलेली दिसतात. देवदासींच्या शारीरिक आणि मानसिक आकांक्षांची पूर्तता न झाल्यामुळे त्यांच्या मनातील विकृती बळावत जातात,

त्यांना मानसिक उदासिनता येते. देवदासींप्रमाणे जोगत्यानाही सामाजिक अवहेलना सहन करावी लागते. त्यांना विवाहव्यवस्थेपासून दूर ठेवले जाते, पुरुषत्त्वाचे खच्चीकरण करून त्यांच्यावर कृत्रिम नपुंसकत्व लादले जाते.प्रेम क्षुधाशांती, कामतृप्ती या भावनांचे व्यवस्थितीकरण कुटुंबात न झाल्यामुळे जोगत्यांना भावनात्मक आघात सहन करावे लागतात.त्यांच्या मनात अस्तित्वशून्यतेचा प्रत्यय गडद होते जातो. हे वास्तव गवस यांनी कथात्म साहित्यातून प्राधान्याने मांडले आहे.

देवदासी जोगते याबरोबर गवस यांनी महार-मांग अशा उपेक्षितांच्या जीवनवास्तवाचे चित्रण गावगाड्याच्या संदर्भात केले आहे. दलितांचे जीवनवास्तव मांडताना त्यांनी समग्र गावगाडा त्यातील अंतर्गत व्यक्तिसंबंधांच्या आधारे आस्थेच्या केंद्रस्थानी ठेवला आहे. दलित-सवर्णसंघर्ष हा गवस यांच्या कथात्म साहित्यातील दलित चित्रणाचा केंद्रबिंदू आहे. या संघर्षाच्याआधारे त्यांनी आधुनिक गावगाड्यातील व्यक्तींची अर्थकेंद्री, भौतिकवादी मानसिकता रेखाटली आहे. सवर्णांनी दलितांचा राजकारणासाठी वापर करून घेतला आणि त्यांची फसवणूकही केली हे वास्तव येथे प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. जातिश्रेष्ठत्त्वाचा अहंभाव संघर्षाला चिथावणी देतो. त्यामुळे परस्परांच्या जातीमधील व्यक्तींची अवहेलना केली जाते. आपली जातिभेदातून केली जाणारी अवहेलना मनात ठेवून सूडाची भावना बाळगली जाते.हे समाजमन गवस यांनी व्यक्त केले आहे. दलित-सवर्ण संघर्षामध्ये दलितांच्या वर्गलढ्याला कोणतेच अधिष्ठान प्राप्त होत नाही. यामागे कार्यकर्त्यांच्या मनात आपल्या नेत्यांविषयी असलेली विभूतिपूजेची वृत्ती, दलित समाजातील शिक्षणाचा अभाव, अज्ञान यातून सवर्ण नेत्यांच्या आहारी जाणे अशी अनेक कारणे असतात. केवळ संघर्षाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन करण्याची कडवी मानसिकता वर्गलढ्याला पोखरून टाकते. आणि गावगाड्यातील सामंजस्याचे वातावरण बिघडून जाते.व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध संघर्षाचे होतात.दलितांच्या या चित्रणाच्या अनुषंगाने गवस यांनी सहकार्याची प्रगतिशील भूमिकाही व्यक्त केली आणि गावगाड्यातील मूल्यात्मकता अबाधित राहण्यासाठी ह्या जाणिवेचा आग्रह धरला, हीच त्यांची नैतिक मूल्यदृष्टी होय.

तिसऱ्या प्रकरणात आपण राजन गवस यांच्या कथात्म साहित्यामध्ये सामाजिक चळवळी व राजकीय प्रवृत्तींचे चित्रण कशाप्रकारे झाले हे विविध संदर्भांनी तपासून पाहिले. साहित्य व सामाजिक वास्तवाचे घनिष्ट संबंध असतात.हे संबंध लेखकाची सामाजिकता, साहित्याची सामाजिकता आणि आस्वादाची म्हणजेच वाचकांची सामाजिकता या निकषांच्या

आधारे स्पष्ट करता येतात. हे आपण प्रस्तुत प्रबंधाच्या प्रास्ताविकात पाहिलेच आहे. या आधारे गवस यांच्या कथात्म साहित्यात सामाजिक चळवळींचे चित्रण कसे झाले आहे, याचा शोध घेतला. वास्तविक समूहाचे स्वातंत्र्य, स्वायत्तता, सर्जनशीलता अबाधित राहावी, त्यातून निकोप समाजनिर्मिती व्हावी, नवे, रसरशित, जिवंत, समृद्ध समाजविश्व उभे राहावे, हे सामाजिक चळवळींचे मुख्य उद्देश असतात. मात्र राजन गवस यांनी चित्रित केलेल्या चळवळी वरील हेतूंपासून फारकत घेतलेल्या दिसतात. चळवळीबाबतचे हे विदारक वास्तव गवस यांनी येथे उघड केले आहे,असे दिसते.गवस यांनी साहित्यातून पुढील चळवळींचे प्राधान्याने चित्रण केलेले दिसते. देवदासीप्रथानिमूर्लन चळवळ, दलित चळवळ, साहित्य चळवळ इ. या चळवळींतील विकृती त्यांनी प्राधान्याने रेखाटल्या आहेत.

देवदासीप्रथानिर्मूलन चळवळीत वावरणारे काही नेते परिवर्तनाची निश्चित भूमिका घेऊन वावरतात तर काही नेते चळवळीला राजकीय लोकांच्या दावणीला बांधून स्वार्थ साधू पाहतात. कार्यकर्त्यांच्या अशा द्वंद्वमूलक मानसिकतेमुळे चळवळीची हानी होते, हे वास्तव गवस यांनी चित्रित केले आहे. चळवळीमधील नेतृत्त्वाचा हव्यास, कार्यकर्त्यांची दांभिकवृत्ती, कार्यकर्त्यांच्या मनातील शहरी, पांढरपेशी वृत्ती आणि प्रसिद्धीलोलूपता यामुळे ग्रामीण भागातील चळवळी पोखरल्या जातात. विशिष्ट वैचारिकतेच्या आग्रही भूमिकांमुळे सामाजिक परिवर्तनाच्या कार्यापेक्षा विभूतिपूजेलाच महत्त्व प्राप्त होते; हे वास्तव गवस यांनी दलित चळवळीच्या अनुषंगाने रेखाटले आहे.

दलित चळवळीला बुद्ध, फुले आणि आंबेडकरांच्या तात्त्विक विचारांची बैठक होती पण कार्यकर्त्यांच्या वरील वर्तनामुळे हा वर्गलढा ऐंशीच्या दशकानंतर फसत गेला. याबाबतच्या घटनाप्रसंगांतून नेतृत्त्वाची अपरिपक्वता, क्रांतीवरचा अवास्तव विश्वास, संघर्ष, नकार, विद्रोह यांच्या ताणलेल्या अवस्था यामुळे सामाजिक एकत्त्व निर्माण होण्यापेक्षा सामाजिक विखंडनच अधिक होत गेले, या वास्तवावर गवस यांनी प्रकाश टाकला आहे. चळवळींसाठी विशिष्ट मूल्यभान आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष करण्याची कार्यकर्त्यांची मानसिकता गवस यांनी रेखाटली. कार्यकर्ते संघर्षाला चिथावणी देतात. त्यामुळे एखाद्या व्यक्तीने घेतलेली प्रगतिशील, न्याय्य भूमिकाही प्रथमदर्शनी अयोग्य ठरवली जाते. साहजिकच अशा व्यक्ती परिस्थितीसमोर हतबल ठरतात. हे चळवळीचे एक अंग गवस यांनी चित्रित केले आहे.

ऐंशीच्या दशकापासून वाङ्मयीन चळवळीसुद्धा अर्थकेंद्री आणि प्रसिद्धीलोलूपतेच्या मानसिकतेमुळे पोखरत गेल्या. 'वर्तमान संस्कृतीचे बळी' ही लेखकांची

प्रतिमा अधिक गडद होत गेली. याचे उपहासात्मक चित्रण गवस यांनी केलेले दिसते. लेखकांना भोवतालच्या वास्तवाचे भान नसणे, मंचिय हव्यास असणे, लेखननिष्ठ नैतिकता नसणे यावर गवस यांनी वाङ्मयचर्चा, संमेलने याबाबतच्या घटनाप्रसंगातून प्रखर भाष्य केले आहे.

बदलते राजकीय वास्तव हा गवस यांच्या राजकीय चित्रणाचा महत्त्वाचा पैलू आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात राजकारणाच्या संकल्पनेत बदल होत गेले. अधिसत्ता गाजविण्याची प्रवृत्ती असे स्वरूप या संकल्पनेला प्राप्त झाले. तसेच जीवनाच्या साऱ्यांच क्षेत्रात सत्ताकारण सुरू झाले. समाजातील स्वार्थी, सत्ताधं व्यक्ती राजकीय क्षेत्रात वावरू लागल्या समाजातील राजकीय व्यवस्थेत विकृती निर्माण होऊ लागली. प्रस्थापित राजकीय व्यक्ती आणि आपले राजकीय अस्तित्व सिद्ध करू पाहणाऱ्या तरुणांमध्ये संघर्ष निर्माण होऊ लागला.आर्थिक बळाचा वापर, हिंसात्मक मार्गांचा आणि अन्य भ्रष्टतेच्या मार्गांचा अवलंब करून सत्ता प्राप्त करण्याची प्रवृत्ती वाढत गेली.हे वास्तव गवस यांनी गावगाड्यातील राजकारणाच्या आधारे रेखाटले. सहकारक्षेत्रातील राजकारण, जातघटकाच्या आधारे केले जाणारे राजकारण, शिक्षणक्षेत्रातील राजकारण व भ्रष्टाचार या प्रमुख मुद्द्यांच्या आधारे राजकारणी प्रवृत्तींची चर्चा केली आहे. सत्तासंपादनासाठी जातीचा वापर करण्याची प्रवृत्ती याच काळात मोठ्याप्रमाणात वाढत गेली. मराठा जातीतील अंतर्गत कलहाबरोबर सवर्ण दलित हा संघर्ष वाढीस लागला. त्यामुळे गावगाड्याची एकसंधता हळूहळू नष्ट होत गेली. समाजातील साऱ्याच घटकांकडे राजकीय दृष्टीतून पहाण्याची प्रवृत्तीही वाढत गेलेली दिसते. ह्या वास्तवावर गवस आपल्या लेखनाद्वारे भाष्य करताना दिसतात.शिक्षणक्षेत्रातही भ्रष्टाचारी प्रवृत्ती वाढत गेल्या सांस्कृतिक, राजकीय अधिसत्तेचाच्या आधारे नोकरभरती, परीक्षापद्धती, प्रकाशनव्यवहार अशा अनेक क्षेत्रात राजकीय शह-काटशह देण्याचे विघातक खेळ सुरू झाले. याविषयीचे अनेक घटनाप्रसंग गवस यांनी रेखाटले आहेत.

चौथ्या प्रकरणात आपण गवस यांच्या साहित्यातील देशीयता आणि लेखकाची जीवनदृष्टी किंवा नैतिकता यांचे स्वरूप तपासून पाहिले. प्रकरणाच्या प्रारंभी देशीयता आणि लेखकाची नैतिकता या संकल्पनांचे स्वरूप सविस्तर विशद केले आहे व त्यानंतरच्या विवेचनात गवस यांच्या साहित्यातील देशीयता आणि नैतिकता यांचे प्रकटीकरण कसे झाले आहे हे तपासून पाहिले. त्या आधारे हाती आलेल्या निष्कर्षांच्या आधारे असे म्हणता येईल की, देशीयता हा साहित्य संस्कृतीकडे पाहण्याचा एक दृष्टिकोण आहे. देशीयतेच्या आधारे साहित्याचे स्वरूप, संस्कृतीचे वेगळपण तपासून पाहता येते. देशीयतेमध्ये भौगोलिकेनुसार बदलत जाणाऱ्या संस्कृतीला महत्त्व दिले जाते. परसंस्कृतीच्या आक्रमणापासून स्वसंस्कृतीची मूल्यात्मकता

अबाधित ठेवण्यासाठी देशीयतेचे तत्त्व उपयुक्त ठरते.

कोणतीही संस्कृती परिवर्तनशील असते. परसंस्कृतीहून काही मूल्ये आत्मसात केली जातात. असे देशीकरण घडताना आपल्या संस्कृतीचे मूळ सत्त्व अबाधित ठेवावे लागते. ही देशीपणाची भूमिका महत्त्वाची असते. लेखक कवी देशी शैली, कलाप्रकार, जीवनमूल्ये, स्वभाषा यांचा आग्रह धरून जेव्हा साहित्यनिर्मिती करतात तेव्हा त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन देशीयतेच्या तत्त्वानुसार करता येते. देशीयतेची संकल्पना संस्कृतीनिष्ठ असल्यामुळे तिच्या स्तरभेदाप्रमाणे बहुजन देशीयता आणि अभिजन देशीयता असे भेद संभवतात. भूमिनिष्ठा अणि स्वसंस्कृतीमधील सकारात्मक व सामूहिक हिताच्या व्यवस्थांचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन ही देशीवादाची प्रमुख तत्त्वे होत.

स्वातंत्र्योत्तर काळात आधुनिक पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमणामुळे ग्रामीण भागात लिहू लागलेल्या लेखकांना देशीपणाचे भान आले. आपल्यावरील पारंपरिक संस्कार आणि आधुनिक जीवनपद्धती यांतील अंतर्विरोधामुळे आत्मसंघर्ष निर्माण झाला यातून बाहेर पडण्यासाठी या लेखकांना देशीयतावादी व्हावे लागले.

लेखकाची नैतिकता म्हणजे विवेकशील दृष्टिकोण. या तत्त्वाच्या आधारे साहित्याचे स्वरूप तपासता येते. कथा-कादंबरीसारख्या साहित्यप्रकारात लेखकाची नैतिकता व्यक्त होत असते. कादंबरीत सामाजिक आशय व्यक्त होत असताना तो लेखकाच्या मूल्यसंस्काराने संस्कारित होणे आवश्यक असते.परिसराच्या आकलनाने लेखकाची ही दृष्टी विकसित झालेली असते तिलाच परिसरनिष्ठ नैतिकता असे म्हणता येते. समाजात विनाशक दमनव्यवस्था असतात. ह्या दमनव्यवस्थाना बहुतांश वेळा समाज निमूटपणे शरण जातो आणि त्यांचा अंगिकारही करतो. अशा वास्तवाकडे लेखक आपल्या विवेकशील दृष्टिकोनातून पाहून, प्रसंगी नकार देऊन समाजाची व आपली सुटका करण्यासाठी प्रयत्नशील राहतो. लेखक वास्तवाला प्रतिक्रिया देताना ती प्रतिक्रिया कोणत्याही अधिसत्तावादी प्रवृत्तीला पूरक ठरणारी नसते. असे लेखन वास्तवाचे यथायोग्य, विवेकशीलतेने चित्रण करणारे असते म्हणून कृतिप्रधान ठरते.

नेमाडे यांनी मांडलेली व्यक्तिनिष्ठ नैतिकतेची संकल्पना आणि समूहनिष्ठ देशीयता ह्या गोष्टी परस्परविरोधी वाटल्या तरी वस्तुतः त्या परस्परपूरक आहेत. कारण परआक्रमण, वसाहतवादी वृत्ती यामुळे आपल्या मूळ संस्कृतीकडे पाहण्याचा समाजाचा जो एक तुच्छतावादी दृष्टिकोण तयार झालेला असतो. तो बदलविण्यासाठी नवनैतिकताच उपयुक्त ठरू शकते.तसेच बऱ्याचवेळा स्वसंस्कृतीमध्येही अनेक प्रकारच्या विकृती निर्माण झालेल्या

असतात. अशा विकृतींकडे समाजातील अधिसत्तावादी प्रवृत्तींच्या माणसांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते, स्वार्थी वा बाजारू प्रवृत्तीची माणसे किंवा एखादा समाजगट सामान्यांचे शोषण करतो तेव्हाही समाजाला जाग आणण्याचे कार्य लेखकाच्या व्यक्तिनिष्ठ नैतिकतेतून पार पडू शकते. अधिसत्ताविरोध हीच नैतिकता असते. सारांश, स्वसंस्कृतीच्या सबलीकरणासाठी आवश्यक असणारी कृतिशीलता नैतिकतेमधून निर्माण होत असते. म्हणून व्यक्तिनिष्ठ नैतिकतेची संकल्पना आणि समूहनिष्ठ देशीयता ह्या गोष्टी परस्पर पूरकच ठरतात.

गवस यांच्या कथात्म साहित्यात भूमिनिष्ठ जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. भूमिनिष्ठा हे देशीयतेमधील महत्त्वाचे तत्त्व असल्यामुळे गवस यांचे साहित्य अपरिहार्यपणे देशीवादी ठरते.आधुनिक खेड्यामधून जे परिवर्तन सुरू झाले ते संघर्षपूर्ण आणिअर्थकेंद्री जीवनव्यवहारांच्या आधारे झाल्यामुळे गावगाड्यातील व्यक्ती व्यक्ती व व्यक्ती समाज यांतील परस्पर भावसंबंध नष्ट होऊ लागले यासाठी बाजारू व संघर्षशील वृत्तीला नकार देऊन गावगाडा वाचवला पाहिजे, ही जाणीव गवस यांनी साहित्यातून व्यक्त केलेली. आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा विपर्यस्त अर्थ लावून समाजात केवळ संघर्षाच्या आधारे परिवर्तन करण्याची दलित कार्यकर्त्यांची मानसिकता गवस यांनी उपहासाचा विषय बनविली आहे.

गवस यांनी व्यक्त केलेली जातजाणीवही लक्षणीय ठरते. जातीजातींमधील तरतमभावातून आलेल्या श्रेष्ठ कनिष्ठतेपेक्षा व्यक्तीच्या वर्तनातून आलेली श्रेष्ठकनिष्ठता गवस व्यक्तीच्या मूल्यमापनासाठी महत्त्वाची मानतात. त्यामुळे जातीच्याआधारे केल्या जाणाऱ्या विभाजनाला आणि कृतीला छेद देण्यासाठी गवस तशी पात्ररचना करताना दिसतात. गावगाड्यातील समन्वयवादी विचारांची पात्र त्यांनी प्रभावीपणे चित्रित केली आहेत. गवस यांनी समाजातील विघातक जातिव्यवस्थेला नकार दिला, त्याच बरोबर समाजविघातक रुढीपरंपराना अव्यवहार्य ठरविले. देशीवाद परंपरेतील विनाशक व्यवस्थांचे पुनरुज्जीवन करीत नाही. तर समाजातील सामूहिक कल्याणाच्या व्यवस्था असतात त्यांचेच पुनरुज्जीवन व संवर्धन करतो. यादृष्टने पाहिल्यास गवस यांचे साहित्य देशीयतावादी ठरते.

गवस यांची नैतिकदृष्टी हे देशीयतेचच एक अंग ठरते.आपली जीवनदृष्टी गवस यांनी तरुण नायकपात्रांच्या आधारे व्यक्त केली आहे.या तरुण पात्रांची मूल्यदृष्टी स्वतंत्र आहे. सर्वसामान्य माणसांच्या जगण्याबाबतच्या कल्पना या पात्रांना मान्य नाहीत. म्हणून हे तरुण आणि भोवतालची माणसे यांच्यामध्ये सततचा मूल्यसंघर्ष घडत राहतो, असे दिसते.

गवस यांनी आपल्या नैतिकदृष्टीच्या आधारे चळवळीत वावरणाऱ्या, विविध सामाजिक संस्थामधून वावरणाऱ्या माणसांच्या वर्तनातील दांभिकता उघड केली आहे. या

माणसांच्या भ्रष्टाचारी वृत्ती, हिंसकता, अर्थप्रधान मानसिकता, त्यांचा प्रसिद्धीचा हव्यास अशा प्रवृत्तींचा उपहास गवस यांनी अनेक घटनाप्रसंगांच्या आधारे केला आहे. तसेच समाजातील विभूतिपूजेच्या वृत्तीवरही गवस यांनी कडाडून हल्ला चढवला आहे. चळवळीसाठी संघटना बांधून, मेळावे-मोर्चे काढून अधिसत्ता गाजविणे, पतसंस्था स्थापन करून भ्रष्टाचार करणे आणि वर्तनापत्री प्रसिद्धीचा हव्यास धरणे अशा विकृत मानसिकतेविषयी गवस यांनी नकाराची भूमिका व्यक्त केली आणि आपल्या नैतिकतेचा प्रत्यय दिला आहे.

ऐंशीनंतरच्या काळात सामाजिक मूल्यव्यवस्थेचे रक्षण करणारी शिक्षण व्यवस्थाच कशी भ्रष्टतेच्या विळख्यात सापडली याचे वास्तवपूर्ण चित्रण गवस यांनी केले आहे. शिक्षक भरतीसाठी वशिला लावणे, पैसे घेणे, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे हडप करणे, शिक्षकांची मुजोरवृत्ती, पैसे घेऊन परीक्षेत उत्तीर्ण करणे, विशेषतः शिक्षण संस्थामधून सुरू झालेले जातिभेदाचे राजकारण अशा अनेक प्रकारच्या सामाजिक गैरवर्तनाचा उपहास गवस यांनी कथा-कादंबऱ्यांतून केलेला आहे.

गवस यांनी आपली नैतिकता साहित्यविषयक व्यवहारांच्या चित्रणातूनही व्यक्त केली आहे. साहित्याच्या क्षेत्रात जी विकृती निर्माण झाली त्याचे वास्तवपूर्ण चित्र त्यांनी रेखाटले. लेखकांचे वर्तनव्यवहार आणि त्यांची मानसिकता यांचा उपहास अनेक प्रसंगांमध्ये येतो. सकस साहित्यनिर्मितीच्या क्षमता नसतानाही स्वतःला प्रस्थापित करण्याची धडपड, साहित्य व्यवहारांपासून विविध लाभ उठवण्याचे प्रयत्न, साहित्यिकांमधील सामाजिक बांधिलकीचा अभाव, कलामूल्यांचे अकारण स्तोम माजवण्याची लेखक-समीक्षकांची वृत्ती, शोषितांच्या दुःखाचे भांडवल करून लिहिणे आणि झटपट प्रसिद्धी प्राप्त करण्याची वृत्ती अशा अनेक विकृत मनोवृत्ती दर्शविणारे घटना-प्रसंग गवस यांनी कथात्म साहित्यात रेखाटले आहेत.

मराठी साहित्याला लोकसाहित्याची बलशाली परंपरा असताना आपण पाश्चात्य साहित्यसंस्कृतीच्या प्रभावाखाला साहित्यनिर्मिती करतो, भारतीय कथनपरंपरा समृद्ध आहे मात्र लघुकथा, तिचे रचनातंत्र हेच आपल्या लेखकाना महत्त्वाचे वाटते, याविषयीची खंत त्यांनी व्यक्त केलेली आहे.लेखन आणि जीवनव्यवहार यामध्ये कमीत कमी अंतर असावे याचा आग्रह त्यांच्या *कळप* कादंबरीतील रघू चिलमी धरतो. साहित्यातील साचेबंदपणा, कंपूशाही, लेखकांची वाचकांचा अनुनय करण्याची वृत्ती, प्रकाशकांचा मुजोरपणा, पुरस्कारांमागील राजकारण, धर्म आणि जातींच्या आधारे केले जाणारे साहित्याचे वर्गीकरण या गोष्टींविषयी गवस आपल्या कडवट प्रतिक्रिया व्यक्त करतात.

शोषितांविषयीचा व्यापक करुणाभाव व्यक्त करणे हे गवस यांच्या नैतिकदृष्टीचे

आणखी एक महत्त्वाचे लक्षण होय. पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांचे जे विविध स्वरूपी शोषण होते त्याचे वास्तवपूर्ण चित्र त्यांनी रेखाटले आहे. स्त्रीचे कोणत्याही प्रकारे उदात्तीकरण न करता तिचे दुय्यमत्व ते अधोरेखित करतात. गवस यांच्या बहुतांश कथा स्त्रीप्रधान आहेत. स्त्रीची अस्वस्थता, कुचंबणा, वेदना, तिचा बंडखोरपणा, या सर्वांमुळे आलेली मनोकुंठीत अवस्था हे त्यांच्या कथांचे केंद्र आहे.गवस यांच्या कथात्म साहित्यातील स्त्रीचित्रणात तिच्या शारीरवर्णनापेक्षा तिच्या मनःस्थितीचे चित्र रेखाटले जाते यातून स्त्रीचित्रणामागे असलेली गवस यांची नैतिकदृष्टी दिसते.

पाचव्या प्रकरणामध्ये आपण राजन गवस यांच्या कथात्म साहित्यातील निवेदन, निवेदनाची विविध तंत्रे आणि भाषा या घटकांचे स्वरूप पाहिले. गवस यांचे साहित्य वास्तवाचे प्रत्ययकारी रूप व्यक्त करते. त्यामुळे त्यांच्या कथात्म साहित्याची भाषा सुद्धा वास्तवाचेच एक रूप आहे. ही बोलभाषा आहे. कथानक, पात्रचित्रण, अवकाशवर्णन याच बरोबर संवाद-भाष्य अशा साऱ्यांच घटकांवर ह्या बोलीभाषेचा प्रभाव पडलेला दिसतो. लेखकाच्या जीवनजाणिवेने धारण केलेले हे बोलीरूप मराठी साहित्यात लक्षणीय आहे. या बोलीभाषेतून सामाजिक प्रश्नांच्या मांडणीबरोबरच प्रदेशाच्या संस्कृतीचे ठसठशीत रूप व्यक्त झाले आहे. बहुजनांच्या संस्कृतीचे त्यातील अंतर्गत तणावांसहित हे चित्रण होते. त्याला ही बोलीभाषा सक्षमपणे तोलून धरते असे म्हणता येईल.

कथात्म साहित्याच्या भाषेकडे अनेक दृष्टिकोणातून पाहिले जाते. तथापि कथात्म साहित्यातील जीवनदर्शन आणि लेखकाची जीवनदृष्टी यांचा भाषेशी घनिष्ठ संबंध असतो. तसेच साहित्याच्या अभ्यासात भाषेच्या माध्यमातून व्यक्त झालेले सांस्कृतिक संदर्भ तपासून पाहणे आवश्यक असतात. यादृष्टीने निवेदन, निवेदनाचे प्रयोग या अंगाने विवेचन करून भाषेचे स्वरूप तपासल्यास विश्लेषणाला तात्त्विक अधिष्ठान प्राप्त होऊ शकते.

गवस यांनी आपल्या कथात्म साहित्यात प्रथमपुरुषी किंवा आत्मनिवेदन आणि सर्वसाक्षी किंवा तृतीयपुरुषी निवेदकाचा वापर सक्षमपणे केला आहे.अशा कोणत्याही निवेदन पद्धतीचा वापर केला तरी त्याद्वारे लेखकाला आपल्या नैतिक जाणिवा व्यक्त करणे शक्य असते. गवस यांनी वरील दोन्ही निवेदन पद्धतीमध्ये आपल्या मूल्यदृष्टीचे प्रत्यंतर दिले आहे.गवस यांच्या कथात्म साहित्यातील निवेदक लेखकाच्या नैतिक मूल्यजाणिवेशी बांधला गेल्यामुळे निवेदनामधील घटना-प्रसंग, पात्रे, अवकाश, संवाद, भाष्य अशा साऱ्याच घटकांमधून लेखकाच्या नैतिकतेचा प्रत्यय येतो.

गवस यांनी कथात्म साहित्यातील बहुतांश कलाकृतीना प्रारंभीच्या आणि

शेवटच्या निवेदनातून आशयाला सूचकतेची परिमाणे प्राप्त करून दिली आहेत,असे दिसते. तसेच लोककथांच्या वापरातून त्यांनी स्वसंस्कृतीमधील लोककथांची प्रतीकात्मता प्रकट केली आहे. येथे त्यांनी केलेल्या निवेदनातून देशीयतेचे भान प्रकट केलेले दिसते. मात्र निवेदनाचे हे तंत्र फडकेप्रणित निवेदन तंत्रांहून भिन्न असलेले लेखकाच्या जीवनदृष्टीशी नाते सांगणारे हे तंत्र आहे. गवस यांनी निवेदनात विविध पद्धतींचाही वापर केला आहे. यापद्धती वा प्रयोग पुढील प्रमाणे आहेत. पारंपरिक निवेदन, काव्यमय निवेदन, दृश्यात्मक निवेदन, वक्तृत्त्वपूर्ण निवेदन, संवादयुक्त निवेदन, बोलीरूप निवेदनअशा निवेदनशैलीप्रकारांचा येथे आढळ होतो.

कथात्म साहित्यातील पात्रचित्रणाच्या आधारे लेखकाची नैतिकदृष्टी व्यक्त होत असते. ज्या शोषित-पीडित पात्रांविषयी गवस यांना आस्था आहे अशा पात्रांचे वर्णन त्यांनी स्वाभाविक, उत्कट शब्दांत केले आहे, तर विकृत-विघातक मानसिकता,स्वसंस्कृती, देशीयतेच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या पात्रांचे वर्णन त्यानी उपहासप्रधान भाषेत केले आहे.पात्रांचे देहवर्णन करण्यापेक्षा गवस यांनी त्यांच्या मानसिकतेचे, अंतरंगाचे चित्रण करण्यावर अधिक भर दिला आहे.पात्रांना समकालीन वास्तवाविषयी पडणारे प्रश्न, त्यांचे आत्मसंवाद, त्यांच्या भाषिक लकबी याद्वारे पात्रचित्रण होताना दिसते. जोगत्यांची पुरुष असूनही स्त्रीवाचक भाषा हा गवस यांच्या साहित्यातील भाषेचा लक्षणीय विशेष होय. एका पात्राचे वर्णन दुसऱ्या पात्राच्या दृष्टिकोणातूनही केले जाते.

गवस यांच्या साहित्यातील अवकाश हा कृषिसंस्कृतीचा अवकाश आहे. मात्र गावगाड्यात आधुनिक काळात आलेल्या, येत असलेल्या नव्या संस्था संघटनांचा आढळही या अवकाशात होतो. असा हा बदलता गावगाडा आहे. भौगोलिकतेपेक्षा पात्रांच्या मानसिकतेतून प्रदेशचित्रण केले जाते. *चौंडकं, भंडारभोग* या कादंबऱ्यांतून गवस यांनी यल्लम्मा देवतेच्या अंधश्रद्धाळू मानसिकतेच्या प्रभावाखाली वावरणारा गावगाडा रेखाटला तर *कळप, तणकट* ह्या कादंबऱ्यांतून जातजाणीव, श्रद्धा-अंधश्रद्धा, सहकार्य- संघर्ष यामधील ताणतणावांचा प्रभाव असलेला गावगाडा चित्रित केला. त्यामुळे अवकाश चित्रणातून समूहाची मानसिकता चित्रित होते. निसर्गचित्रणातून पात्रांचे भावजीवन दिसते तसे कृषिसंस्कृतीच्या सणा-उत्सवांतूनही प्रकट होताना दिसते. सामाजिक वास्तव आणि नैतिकमूल्यदृष्टी व्यक्त करणारे संवाद हे गवस यांच्या भाषेचे महत्त्वाचे लक्षण ठरते. भाष्य अनेक ठिकाणी संवादातून व्यक्त होताना दिसते. पात्रांची विपुलता असल्यामुळे संवादमयताही अधिक असलेली दिसते. संवादातून कुटुंबकलह,पात्रांची मानसिकता, विचारविश्व प्रकट केले जाते. साध्या घटनांच्या चर्चांमधून गंभीर अशा जीवनचिंतनाकडे वळणारी संवादशैली हे गवस यांच्या निवेदनशैलीचे

वैशिष्ट्य आहे.

गवस यांच्या भाषाशैलीचे ठळक विशेष पुढीलप्रमाणे-उपहास-उपरोधप्रधानता, उत्कटता, प्रतीक-प्रतिमाप्रधानता, काव्यमयता, चिंतनशीलता, बोलीरूपता हे आहेत.असे विविध विशेष प्राप्त भाषेला झालेले दिसतात. उपहासाच्या अनुषंगाने विनोदप्रधानताही येते. त्याचबरोबर देवदासींची, जोगत्यांची भाषा, देवदासींची, शाहिरांची गाणी यांचा वापरही निवेदनात केला गेला आहे. बोलीरूप भाषेचा प्रभावी वापर करून गवस यांनी आपल्या नैतिक जाणिवेबरोबर देशी शैलीचा प्रत्यय दिला आहे.पात्रांची व्यक्तिनामे, विशेषणे, क्रियापदे यावर बोलीचा प्रभाव जाणवतो. तसेच अर्थवाही संस्कृतीनिष्ठ शब्दप्रयोग, म्हणी व वाक्‌प्रचार यांच्या वापरातून भाषेला प्रदेशनिष्ठ रूप प्राप्त झाले आहे, असे म्हणता येईल.

सहाव्या प्रकरणामध्ये गवस यांच्या साहित्याचे मूल्यमापन केले आहे. हे मूल्यमापन गवस यांच्या साहित्यलेखनाच्या प्रेरणा, राजन गवस यांच्या कथात्म साहित्यातील आशयसूत्रांची विविधता गवस यांच्या कथात्म साहित्याची वास्तवाशी बांधिलकी, राजन गवस यांच्या जीवनदृष्टीचे वेगळेपण, राजन गवस यांच्या साहित्यातील वैचारिकता, राजन गवस यांच्या कथात्म साहित्यावरील वाङ्मयीन प्रभाव, गवस यांच्या कथनशैलीचे वेगळेपण : बोलीभाषेचे वैशिष्ट्यपूर्ण रूप तसेच गवस यांच्या साहित्याचे मराठी साहित्यप्रवाहातील स्थान या मुद्द्यांच्या आधारे केले आहे.

गवस यांच्या साहित्यलेखनाची प्रमुख प्रेरणा ही आत्मप्रकटीकरणाची आहे. प्रत्यक्ष सामाजिक कार्यकर्ता म्हणून वावरताना जे समाजवास्तव अनुभवास आले त्या समाजवास्तवावरच गवस यांनी भाष्य केले आहे. अनुभव घेणे आणि त्याचे साहित्यिक अनुभवात परावर्तन करणे ही प्रक्रिया त्यांच्या लेखनात घडते. म्हणूनच. "आपण जे पाहतो, जे अनुभवतो तेच कादंबरीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे." असे त्यांनी म्हटले आहे. यावरून असे म्हणता येईल की, विकृत, विघातक व विसंगत समाजवास्तवातून आलेली अपरिहार्य अस्वस्थता ही गवस यांच्या लेखनाची प्रेरणा असलेली दिसते.

गवस यांच्या कथात्म साहित्यात आशयसूत्रांची विविधता दिसते. कारण धर्म, राजकारण, शिक्षण, साहित्य, अर्थसत्ता, सांस्कृतिक चळवळी, कृषिव्यवस्था, ग्रामीण संस्कृती अशा समग्र जीवनव्यवहारांचा व त्या जीवन व्यवहारांमागील समाजधारणांचा वेध त्यांनी कथात्म साहित्यातून घेतला आहे. अशा विविधस्वरूपी आशयसूत्रांमुळे गवस यांच्या साहित्याने मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली दिसते.

गवस यांच्या कथात्म साहित्याचा वास्तवाशी किती घनिष्ट संबंध आहे याचा

विचारही प्रस्तुत विवेचनात केला आहे. ऐंशीच्या दशकापासून गावगाड्यात सुरू झालेल्या परिवर्तनाचे चित्रण गवस यांनी केले. गावगाड्यातील विविध सामाजिक संस्थामधील जीवनव्यवहावर अर्थकेंद्री मानसिकता आणि राजकीय प्रवृत्तींचा मोठा प्रभाव या काळात पडला. आणि सारे जीवनव्यवहार आपल्या मूळ संस्कृतीपासून तुटू लागले, हे वास्तव गवस यांनी रेखाटले. प्रदेशनिष्ठ आशय आणि प्रदेशनिष्ठ भाषा याच्या प्रकटीकरणातून गवस यांनी मराठी संस्कृतीच्या एका उपसंस्कृतीचे दर्शन घडविले आहे. गवस यांच्या साहित्यातील उपेक्षितांचे चित्रण असो वा राजकारण, चळवळी यांचे चित्रण असो, हे सारेच लेखन प्रत्यक्ष वास्तवाशी घनिष्ट नाते सांगणारे आहे. गवस यांनी व्यक्तिचित्रणाद्वारे समाजाची द्वंद्वात्मक वा संघर्षात्मक मानसिकता आणि स्वार्थपरायणता ह्या प्रवृत्ती वास्तवाचा एक भाग म्हणून चित्रित केल्या, तसेच उपेक्षितांच्या वेदनादायी जीवनप्रवासाचे चित्रही साकार केले आहे.

गवस यांची वैशिष्ट्यपूर्ण जीवनदृष्टी रूढ दलित साहित्यिकांहून भिन्न असलेली दिसते. आपल्या साहित्यातून वेदना, विद्रोह, नकार या तत्त्वांपेक्षा करुणा, दुःख, समन्वय आणि देशीयता ह्या मूल्यांना त्यांनी प्राधान्य दिले. प्रादेशिक अस्मिता त्यांनी महत्त्वाची मानली. केवळ उच्चवर्गीयांच्याच नव्हे तर साऱ्याच समाजाच्या विकृत विसंगत वर्तनामुळे समाजातील काही घटकांना पाशवी पातळीवरचे हीन जीवन जगावे लागते, ही वास्तविकता गवस अधोरेखित करतात. कोणत्याही रंजनप्रधानतेच्या आहारी न जाता ते जीवनानुभवांचे प्रकटन करतात. गवस यांची जीवनदृष्टी समाजाच्या सरधोपट जीवनदृष्टीहून भिन्न आहे. धर्मव्यवस्था, सामाजिक चळवळी यांबाबत गवस यांनी व्यक्त केलेली नैतिकता ही स्वतंत्र तितकीच लक्षणीय ठरते. आशयाची निवड, व्यक्तिचित्रण, अवकाशवर्णन आणि भाषा अशा कथात्म साहित्याच्या साऱ्याच घटकांतून जाणवते.गवस यांच्या साहित्यात वैचारिकतेला विशेष महत्त्व प्राप्त झालेले दिसते. समाजातील सारे संस्थात्मक व्यवहार भ्रष्टाचारविरहित असावे असा आग्रह त्याची पात्रे धरतात. फुले, गांधी आंबेडकरांचे दैवतीकरण न करता त्यांच्या विचारांचे सारतत्त्व समाज जीवनातील संघर्षहीन, सौहार्दपूर्ण, सहकार्याच्या जीवनव्यवहारांना उपयुक्त ठरू शकते, ह्या विषयीचे चिंतन गवस यांनी विशिष्ट घटना-प्रसंगांच्या आधारे मांडले आहे.

गवस यांच्या साहित्यावर काही पूर्वसूरी लेखकांच्या लेखनाचा प्रभाव आहे. त्यामध्ये भालचंद्र नेमाडे, व्यंकटेश माडगूळकर, भाऊ पाध्ये यांचा समावेश करावा लागेल. मात्र गवस यांनी त्यांच्या लेखनाचे अनुकरण केले असे म्हणता येणार नाही.गवस यांनी साध्या नैसर्गिक घटनाक्रमावर भर देणाऱ्या कथनशैलीचा वापर आपल्या साहित्यात केलेला दिसतो. त्यांच्या साहित्याचा निर्मितीक्रम आणि विकासक्रम पाहता त्यांची कथन शैली बदलत गेलेली

दिसते. गवस यांच्या *चौंडकं* आणि *भंडारभोग* या कादंबऱ्यांवर व्यंकटेश माडगूळकरांच्या लेखनशैलीचा प्रभाव जाणवतो. *धिंगाणा* ही कादंबरी वासूनाका या कादंबरीच्या वळणाने जाते. तर त्या नंतरच्या कादंबऱ्यांवर नेमाडे यांच्या *कोसला*चा प्रभाव जाणवतो. मात्र या लेखकांच्या कथनशैलीचे प्रभाव पचवून गवस स्वतंत्र रचना करताना दिसतात. गवस यांनी *कळप* कादंबरीत पारंपरिक कथनशैलीचे संस्कार मूरवून घेतलेले दिसतात. विशेषतः आशयाच्या बाबतीत गवस गावगाड्यातील प्रदेशनिष्ठ आशय निवडतात आणि त्याला सांस्कृतिक चित्रणाचे मूल्य प्राप्त करून देतात.

गवस यांच्या कथात्म साहित्याची भाषा, बोलीभाषेचे वैशिष्ट्यपूर्ण रूप उलगडून दाखवते. या भाषेचा वास्तवाशी असलेला संबंध अत्यंत घनिष्ठ आहे. गवस यांच्या साहित्यातून जोगत्यांची स्त्रीसुलभ भाषा, देवदासींची हतबल, दु:खाचा सूर आळवणारी भाषा, चळवळीतील आक्रमक, स्वार्थी कार्यकर्त्यांची अविवेकाचे दर्शन घडवणारी भाषा, महाविद्यालयीन तरुणांची, तरुण लेखकांची भाषा असे भाषेचे विविध नमुने पाहावयास मिळतात. विशेषत: तरुणांच्या, राजकीय व्यक्तींच्या तोंडची भाषा वादविवादाच्या स्वरूपाची भाषा आहे. मात्र ही सारी भाषा ग्रामीणता या मूल्याने संस्कारित झालेली दिसते. अशा विविधस्वरूपी भाषाप्रयोगामुळे गवस यांचे कथात्म साहित्य एकूण मराठी साहित्यात मौलिक ठरते.

गवस ऐंशीनंतरच्या मराठी साहित्यात मोलाची भर घालणारे लेखक आहेत. त्यांनी आपल्या लेखनातून चित्रित केलेला गावगाडा समकालीन मराठी लेखकांच्या लेखनात अभावानेच दिसतो. गावगाडा केंद्रस्थानी ठेऊन त्या अनुषंगाने साहित्यकृतींची निर्मिती केली जाणे हे गवस यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. तसेच दलित, ग्रामीण, प्रादेशिक या साहित्यप्रवाहातील भेदरेषा मिटवून टाकण्याचे प्रयत्न गवस यांनी आपल्या लेखनाद्वारे केले. त्यांनी कथेतून जे गावगाड्यातील स्त्रिजीवनाचे चित्रण घडविले तेही वैशिष्ट्यपूर्ण ठरावे असे आहे.

उपरनिर्दिष्ट लेखन वैशिष्ट्यांवरून गवस यांच्या कथात्म साहित्याचे स्वरूप निश्चित होते असे म्हणता येईल. गवस यांनी आपल्या लेखनाने मराठी साहित्याचा परिघ निश्चितच वाढवत नेला असे म्हणता येईल. जीवनदर्शन, व्यक्तिचित्रण, अवकाशचित्रण, चिंतनशीलता, लेखकाची नैतिकता आणि भाषाशैली अशा कथात्म साहित्याच्या विविध घटकांत त्यांनी वैशिष्ट्यपूर्णता आणली. मराठी साहित्यप्रवाहात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात गवस यशस्वी ठरले यात शंका नाही. यादृष्टीने मराठी साहित्याला त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.

*****